**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन भाषा मराठीत पुरावा</u>**

<u>तक्रारकर्त्यार्तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ याची शपथेवर साक्ष</u>

मी शपथपुर्वक निवेदन करतो कीः

माझे नावः विद्याधर नारायण बेडेकर,

वयः ६१ वर्षे, व्यवसायः नोकरी, मॅनेजर.

राहणारः रोहा, ता. रोहा, जि.रायगड.

**<u>सरतपासणी तक्रारकर्त्यार्तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर.बी. सावंत यांचे मार्फत शपथेवर सुरु</u>**

०१. दि.०१/०२/१९८७ पासून मी साधना नायट्रोकेम लिमीटेड कंपनीमध्ये कार्यरत आहे. सदर कंपनीचा कारखाना धाटाव येथे प्लॉट क्र.४७ येथे आहे. सदर कंपनीची मौजे भुवनेश्वर–वरसे येथे अनुराधा कॉम्प्लेक्स नावाने निवासी इमारत आहे. सदर इमारत साधना कंपनीमधील मॅनेजर व अधिकारी वर्ग यांना राहण्याकरीता आहे. सदर इमारतीचा कर आकारणी उतारा मी अभिलेखावर दाखल केला आहे. त्यास **नि.क्र.४६** देण्यात येतो. त्याचप्रमाणे मी अभिलेखावर मौजे भूवनेश्वर येथील गट क्र.२८ब चा वर्ष २०१३–१४ ते २०१५–१६ चा ७/१२ उतारा साक्षांकीत प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.४७** देण्यात येतो.

०२. मी प्रस्तूत प्रकरणातील आरोपी दिलीप शांतवन पारखे यांना ओळखतो. दि.०१/०२/२००१ रोजी आरोपी आमचे सदर कंपनीमध्ये रुजू झाला. त्या अनुषंगाने आरोपीला कंपनीने नेमणूक पत्र पाठवले होते. सदर नेमणूक पत्र त्याला मान्य आहे या अनुशंगाने त्यावर सही केलेली आहे. सदर पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे आरोपीला देण्यात येणारे भत्ते व अनुराधा कॉम्प्लेक्स इमारतीमध्ये राहण्याकरीता जागा देण्यात आली होती.

आरोपीला सदर इमारतीच्या ए विंग मधील तीन क्रमांकाचा ब्लॉक देण्यात आला होता. त्याचा घर क्रमांक ११०५ आहे. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले. त्यावर आमचे कंपनीचे डायरेक्टर व कंपनी सेक्रेटरी म्हणून एन. आर. जानी व आरोपीची सही आहे. मी त्या दोघांच्या सह्या ओळखतो. त्यातील मजकूर बरोबर आहे. सदर पत्रास **नि.क्र.४८** देण्यात येतो.

०३. आरोपीला देण्यात आलेले घर क्र.११०५ मध्ये विजेची सुवीधा होती. त्याला वेगळे विज मिटर देण्यात आले होते. त्या अनुषंगाने विज बिलाची मुळ प्रत मी अभिलेखावर दाखल केली आहे. त्यातील मजकूर माझे माहितीप्रमाणे बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४९** देण्यात येते. आरोपीला देण्यात आलेले सदरील घर त्याने तो आमचे कंपनीचे सेवेत असेपर्यंत उपभोग घेणे अपेक्षीत होते.

०४. दि.१३/०८/२०१५ रोजी आरोपीने आमचे कंपनीतील त्याचे नोकरीचा लेखी राजीनामा दिला. सदर राजीनामा अस्सल प्रत मी अभिलेखावर दाखल केली आहे. त्यावर आरोपीची सही आहे. त्यावेळी आरोपीने कंपनीकडे एक महिना घरामध्ये राहण्याची मुदत मागितली होती. त्याप्रमाणे कंपनीने आरोपीला एक महिन्याची मुदत दिली होती. परंतू सदर मुदत संपल्यानंतर आरोपीने कंपनीतर्फे त्याला देण्यात आलेले घर खाली केलेले नाही. त्यानंतर आमचे कंपनीतर्फे ०२–०३ वर्षांपर्यंत आरोपीला सदरील घर खाली करण्याचे अनुशंगाने तोंडी कळवीण्यात आले. परंतू, आरोपीने त्याप्रमाणे पुर्तता न केल्यामुळे कंपनीकडून आरोपीसोबत लेखी पत्रव्यवहार करण्यात आला.

०५. त्या अनुशंगाने दि.०३/०५/२०१८ रोजी कंपनीने आरोपीला लेखी पत्र पाठवीले. सदर पत्राची स्थळ प्रत मी दस्तऐवज यादी नि.क्र.०४ प्रमाणे दस्त क्र.०३ अन्वये दाखल केली आहे. सदर पत्रावर कंपनीतर्फे माझी सही असून ते आरोपीला मिळाल्याबाबत त्याची देखील त्यावर सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५०** देण्यात येते.

सदर पत्रासोबत आम्ही आरोपीला फुल अॅण्ड फायनल सेटलमेंट दस्त पाठविला होता. त्यावर आमचे अकाउंट मॅनेजर यांची सही असून मी ती ओळखतो. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५१** देण्यात येते. सदरील दि.०३/०५/२०१८ रोजीचे पत्रास आरोपीने दि.१५/०५/२०१८ रोजी लेखी उत्तर पाठविले होते. त्याची प्रत मी अभिलेखावर दाखल केली आहे. त्यावर आरोपीची सही आहे. (सदरील पत्र पाठविल्याची बाब आरोपीला मान्य आहे.) त्यामुळे त्यास **नि.क्र.५२** देण्यात येते.

**न्यायालयाची वेळ संपत आल्यामुळे उर्वरीत सरतपासणी पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत

SUNIL SAKHARAM MAHALE
Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2025.03.05 17:32:37 +0530

स्थळ : रोहा.　　　　(एस. एस. महाले)
दि.०५.०३.२०२५.　　　　न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.